**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)**
मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर पिन.४२३१०९
फोन नं. (०२४२३) २५८५००/२५८७७१/२५८७७२ फॅक्स नं.२५८८७०
(Website www.sai.org.in , E-mail – purchase@sai.org.in)

## जाहीर ई-निविदा

श्री साईबाबा संस्थानचे प्रसादालय,लाडू निर्मिती, कॅन्टीन व मंदिर विभागांसाठी सन २०२१-२२ करीता (एप्रिल २०२१ ते मार्च २०२२) खालील साहित्य खरेदीकामी पुरवठाधारक, वितरक, उत्पादक यांचेकडून ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.नं | निविदेचा तपशील | निविदा फी | बयाणा रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | पेपर कप | १३,२००/- | १,३२,०००/- |
| ०२ | टोन्ड गाय दुध | ३०,०००/- | ३,००,०००/- |
| ०३ | पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर | १८,०००/- | १,८०,०००/- |
| ०४ | पेपर पिशवी | १८,०००/- | १,८०,०००/- |

१. ई-निविदा व ई-निविदेबाबतच्या अटी व शर्ती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

२. निविदा ऑनलाईन डाऊन लोडींग व अपलोडींगसाठी दि.२६/०३ /२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून ते दि. २३ /०४ /२०२१ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहतील.

३. निविदा फी व बयाणा रक्कम शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन भरावी

४. दि.२४ / ०४ /२०२१ ते दि. २६/०४ /२०२१ या कालावधीत सायं.०५.०० वाजेपर्यंत (रविवार खेरीज) निविदेमध्ये दर भरलेल्या साहित्याचे नमुने शिर्डी येथील खरेदी विभागाचे कार्यालयात जमा करावेत.

५. शक्य झाल्यास तांत्रिक निविदा दि.२७/ ०४ /२०२१ रोजी उघडण्यात येतील.

कोणतीही निविदा अंशत:/पुर्णपणे स्वीकारणे अथवा सर्व निविदा नाकारणेचा हक्क संस्थानने राखून ठेवलेला आहे.

२२/०३/२१

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी

Scanned by CamScanner

**SHRI SAIBABA SANSTHAN TRUST, SHIRDI**
At/post-Shirdi, Tal-Rahata, Dist- Ahmednagar- 423109
Phone No.(02423) 258500/771/772, Fax No.02423-258870
(Website www.sai.org.in , E-mail – purchase@sai.org.in)

---

## E-TENDER NOTICE

E-tenders are invited from Suppliers, Manufacturers, Dealers for the supply of following material for our Prasadalya, Ladu Nirmiti, Canteen & Temple Department for the year 2021-22 (April 2021 to March 2022).

| Sr.NO | Tender Description | Tender Fee | E.M.D. |
|---|---|---|---|
| 01 | Paper cup | 13,200/- | 1,32,000/- |
| 02 | Toned Cow Milk | 30,000/- | 3,00,000/- |
| 03 | Packaged Drinking Water | 18,000/- | 1,80,000/- |
| 04 | Laminated Paper Bags | 18,000/- | 1,80,000/- |

1. E-Tenders & its terms and conditions are available on www.mahatenders.gov.in.
2. The E-Tenders are available for Downloading & Uploading from Dt. 26 / 03 /2021 11.00 AM to 23 / 04 /2021 up to 5 PM.
3. Tender Fee & EMD should be paid Online on the website www.mahatenders.gov.in
4. The samples of Material are to be submitted from 24/ 04/2021 10 AM to 26 / 04 /2021 up to 5.00 PM at our Shirdi Purchase office on all working days except Sunday.
5. If possible Technical Bids will be opened on 27/ 04 /2021.

Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi reserves the right to accept partly/fully any tender or reject all tenders without assigning any reason thereof.

22/03/21

**(Kanhuraj Bagate, I.A.S.)**
**CHIEF EXECUTIVE OFFICER**

17/3/2021

Scanned by CamScanner

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

शिरडी ४२३ १०९.
तालुका-राहाता, जिल्हा-अहमदनगर

दुरध्वनी क्रमांक (०२४२३) २५८५००, खरेदी विभाग- २५८७७१, २५८७७२,
फॅक्स क्रमांक ०२४२३-२५८८७०
Website – www.sai.org.in E-mail 1.saibaba@sai.org.in 2.purchase@sai.org.in

मुंबई कार्यालय - साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, दादर
मुंबई-४०० ०१४ दूरध्वनी क्रमांक (०२२) २४१६६५५६, २४१६१२९३

## सन २०२१-२२
## (माहे एप्रिल-२०२१ ते मार्च-२०२२ अखेर)
## श्री साईबाबा संस्थानचे कॅन्टीन विभागासाठी
## पॅकेज्ड ड्रिंकींग वॉटर बोटल पुरविणेबाबत ई-निविदा

8
17/3/2021

Scanned by CamScanner

**A.** निविदेचा तपशिल- श्री साईबाबा संस्थानचे कॅन्टीन विभागासाठी पॅकेज्ड ड्रिंकींग वॉटर बोटल पुरविणेबाबत ई-निविदा

**B.** **ई-निविदेसोबत सादर करावयाची कागदपत्रे, आर्थिक उलाढालीचे निकष वगैरे तपशील खालीलप्रमाणे-**

१. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने अदयावत दुकान नोंदणी दाखला/स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला/ तत्सम शासकीय परवाना ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

२. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने GST नोंदणी दाखला अगर GST Online Registration Receipt ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

३. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने अदयावत ISI परवाना ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

४. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने पॅन कार्ड ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

५. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या फर्मची सन २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२० या ३ आर्थिक वर्षांची वार्षिक उलाढाल नमुद असणारे व निविदेसोबत दिलेल्या नमुन्याप्रमाणे सी.ए यांचे प्रमाणपत्र ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

६. निविदाधारकाची वरील नमुद ३ अर्थिक वर्षाची किमान वार्षिक सरासरी उलाढाल रु.३६,८०,०००/- असणे अनिवार्य राहिल.

**C.** **निविदाधारकाने मालाचे नमुने सादर करण्याची पध्दत-**

१. निविदाधारकाने निविदा भरलेल्या १ लिटर/५०० मिली बोटलचे प्रत्येकी ४-४ नग नमुने बॉक्समध्ये सिलबंद करून संस्थानच्या खरेदी विभागामध्ये विहित मुदतीत जमा करणे अनिवार्य राहिल. बॉक्सवर बोटलचा ब्रॅन्ड तसेच आपले फर्मचे नांव लिहिलेले असावे. दिलेले बोटल नमुने कोणत्याही सबबीवर परत केले जाणार नाहीत अगर बदलता येणार नाहीत.

२. बोटलचा एकाच ब्रॅन्डचा उच्चतम दर्जाचा एकच नमुना सादर करावा. दोन किंवा अधिक नमुने सादर करू नये. तसे केल्यास एकाच नमुन्याचा विचार केला जाईल.

३. निविदा भरलेल्या बोटलची यादी नमुने सादर करताना सोबत सादर करणे आवश्यक आहे.

४. निविदाधारकाने ब्रॅन्ड बोटलचा नमुना निवडीसाठी असा नमुने द्यावेत की पुरवठा आदेश मिळालेनंतर त्याच नमुन्याच्या बोटलचा संस्थानला पुरवठा होईल.

**D.** **पुरवठा करावयाच्या साहित्याचा तपशिल, निविदा फी व बयाणा रक्कम-**

१. पुरवठा करावयाचे साहित्याचा तपशिल BOQ मध्ये दिलेला आहे. त्यात ऑनलाईन दर नमूद करून निविदा ऑनलाईन भरावयाची आहे.

२. निविदा फी रक्कम रु.१८,०००/- व बयाणा रक्कम रु. १,८०,०००/- मात्र www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन भरावी.

३. १ लिटर व ५०० मिलीच्या पाणी बोटलवर For Sai Sansthan only Rs. --- /- हा मजकूर छपाई करुन दयावा लागेल. मजकूर पुरवठा आदेश देते वेळी देण्यात येईल.

४. **MSME अंतर्गत निविदा फी व बयाणा रक्कम न भरण्याची सवलत या निविदेला लागू नाही. सर्व निविदाधारकांनी निविदा फी व बयाणा रक्कम भरणे अनिवार्य आहे.**

**E.** **निविदाधारकांसाठी सुचना-**

१. सदर निविदा दि. 26/ 03 /२०२१ रोजी सकाळी ११.०० वा.पासून दि. 23/ 04 /२०२१ सायं. ०५.०० वाजेपर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Downloading व Uploading साठी उपलब्ध राहील.



17/3/2021

२. ई-निविदा भरलेल्या पाणी बोटलचे नमुने दि. 28/ 08 /२०२१ ते दि. 28/ 08/२०२१ अखेर सायं. ५.०० वाजेपर्यंत (रविवार खेरीज) संस्थानचे शिर्डी येथील खरेदी विभागाचे कार्यालयात जमा करावेत.

३. ई-निविदेसोबत फक्त Online कागदपत्रे सादर करावयाची आहेत. Hard Copy मध्ये कागदपत्रे सादर करु नयेत. Hard Copy मध्ये सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही.

४. शक्य झाल्यास दि. 20/ 08 /२०२१ रोजी Online Technical Bid उघडण्यात येईल. तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकांच्याच कमर्शिअल निविदा उघडण्यात येतील.

५. Commercial Bid उघडणेचे दिवशी आपण किंवा आपले प्रतिनिधींनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. ऑनलाईन निविदा सादर करताना निविदाधारकांनी आपले फोन नंबर्स ऑनलाईन निविदेमध्ये दिलेल्या तक्त्यात नमूद करावेत म्हणजे पात्र ठरणा-या निविदाधारकांना Commercial Bid उघडणेची तारीख व वेळ कळविता येईल.

६. नमुने नसलेली निविदा विचारात घेतली जाणार नाही.

## F. निविदेत ऑनलाईन दर भरतांना सर्व कर व खर्चासह दर नमूद करणे-

१. निविदेमध्ये ऑनलाईन दर भरतांना GST-TDS अगर इतर कुठलाही शासकीय कर तसेच पॅकिंग व फॉरवर्डिंग खर्च, जकात, वाहतूक, वाराई वगैरे सर्व खर्चासह शिर्डी संस्थानचे भांडार विभागामध्ये पोहोचचे दर या सर्व बाबींचा विचार करूनच दर भरावेत.

२. शासन नियमानुसार वेळोवेळी लागू होणारे कर पुरवठाधारकावर बंधनकारक राहतील व त्याप्रमाणे रक्कम बीलातून कपात करण्यात येईल. शासनाने १ ऑक्टोबर २०१८ पासून करपात्र वस्तु/सेवा अथवा दोन्हीसाठी पुरवठादाराला करावयाचे प्रदानातुन २% GST-TDS वजा करणेबाबत परिपत्रक क्रं.२०१८०९२८१७१४३६६६०५ अन्वये निर्देशित केले आहे. त्याचाही निविदा भरतांना निविदाधारकाने विचार करावा. याबाबतची आधिक माहिती महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळावर उपलब्ध आहे

## G. ऑनलाईन निविदा उघडण्याची व नमुने निवडण्याची कार्यपध्दती-

१. निविदेचा Download कालावधी संपल्यानंतर खरेदी समितीचे सभेत ऑनलाईन तांत्रिक ई-निविदा प्रथम उघडण्यात येतील. त्यानंतर तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकांनी सादर केलेल्या पाणी बॉटलचे नमुने तज्ञ समितीमार्फत निवडण्यात येतील.

२. नमुने निवडून अंतिम झालेनंतर कमर्शिअल बीड उघडण्यात येऊन नमुने निवड झालेल्या निविदाधारकांच्या दरांचा तुलनात्मक दृष्टया विचार करण्यात येईल व यामध्ये न्युनतम दरधारकांशी चर्चा व वाटाघाटी करण्यात येतील व त्यानुसार अंतिम निर्णय घेतला जाईल.

## H. पाणी बॉटल पुरवठा करावयाचे ठिकाण-

१. निविदेत नमूद केलेल्या पाणी बोटलचा पुरवठा शिर्डी येथील संस्थानचे श्री साईमंदिराचे जवळील भांडार विभागामध्ये अगर बायपास रोडवरील संस्थानच्या गोडावूनमध्ये अगर मुख्य कॅन्टीन व ५०० रुम कॅन्टीन याठिकाणी करावा लागेल.



17/3/2021

Scanned by CamScanner

## I. सुरक्षा अनामत रक्कम व करारनामा-

१. शासनाच्या खरेदी नियमावलीप्रमाणे ज्यांच्या निविदा मंजूर होतील त्यांना विहीत मुदतीत बोटलचा पुरवठा करावयाची हमी म्हणून एकुण पुरवठा आदेश रकमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून संस्थानकडे ठेवावी लागेल निविदा मंजुर झाल्याचे कळविलेनंतर सदर रकमेचा भरणा करावा लागेल. ही सुरक्षा अनामत रक्कम व्यवस्थितरित्या सदर पाणी बोटलचा पुरवठा केलेनंतर परत केली जाईल. सुरक्षा अनामत अगर बयाणा रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

२. निविदा मंजुर झालेनंतर ३% सुरक्षा अनामत रक्कम त्वरित भरावी लागेल. तसेच शिर्डी येथे समक्ष येऊन रु.६००/- चे स्टॅम्प पेपरवर त्वरित करारनामा नोटरी करुन देणे बंधनकारक राहील. करारनाम्याची नोटरी फी पुरवठाधारकास आदा करावी लागेल.

## J. पाणी बोटल पुरवठा करण्याची मुदत -

१. पाणी बोटल पुरवठा करण्याचा कालावधी १ एप्रिल २०२१ ते ३१ मार्च २०२२ असा राहिल.

२. पाणी बोटल चलनात दिलेले Schedule प्रमाणे अगर भांडार व कॅन्टीन विभागाने वेळोवेळी दिलेले वेळापत्रकाप्रमाणे करावा लागेल. प्रसंगी दूरध्वनीवर कळविलेवरही पुरवठा करावा लागेल.

३. शिर्डी येथे दर्शनासाठी भेट देणा-या साईभक्तांच्या गर्दीवर हि सेवा अवलंबुन असलेमुळे प्रत्येक महिन्यात अगर कमी जास्त मुदतीत अगर संस्थानचे धोरणानुसार गरजेप्रमाणे पाणी बोटलची मागणी केली जाईल. एकदम सर्व बोटल घेतल्या जाणार नाही. संस्थानचे खरेदी चलनाप्रमाणे वेळोवेळी बोटलचा पुरवठा करावा लागेल. तसेच मागणीपेक्षा जादा आलेल्या बोटल स्विकारल्या जाणार नाही.

४. संस्थानची सदर मागणी ही अंदाजित असल्यामुळे पुरवठा कालावधीत अगर त्यानंतरही पुढील वर्षाची खरेदी संबंधीत प्रक्रिया पुर्ण होईपावेतो आवश्यकतेनुसार मंजुर केलेल्या परिमाणापेक्षा २५ टक्केपर्यंत जादा बोटलची मागणी संस्थानकडून झाल्यास त्याचा पुरवठा मान्य दरानेच करणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. तसेच पुरवठा आदेशामध्ये नमुद केलेल्या सर्व पाणी बोटल्स खरेदी करणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.

## K. पाणी बोटलचा स्वीकार करण्याची पध्दत-

१. पुरवठा आदेशातील ब्रॅन्ड/ वर्णनाप्रमाणेच पाणी बोटलचा पुरवठा करावा व त्याप्रमाणेच बिल सादर करावे.

२. ज्या ब्रॅन्डच्या निविदा मंजुर होतील त्याच मान्य झालेल्या ब्रॅन्डच्या पाणी बोटल पुरवाव्या लागतील. कमी दर्जाच्या वेगळया प्रकारच्या किंवा खराब पाणी बोटल स्विकारल्या जाणार नाहीत. अशा बोटल पुरवठा झाल्यास त्या स्वखर्चाने तात्काळ परत घेऊन जाणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. त्या न नेल्यास त्यांची नासधूस झाल्यास त्यास संस्थान जबाबदार राहणार नाही.

३. पुरवठाधारकाला पुरवठा आदेश दिलेनंतर संस्थानचे तज्ञ समितीने निवडलेल्या ब्रॅन्डप्रमाणेच बोटल पुरवणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहिल.

४. पुरवठा आदेशाप्रमाणे संस्थानकडे बोटल पाठविल्यानंतर संस्थानने विहीत केलेले यंत्रणेकडून तपासणी केली जाईल. पुरवठा आदेशाप्रमाणे बोटलचा पुरवठा केल्यास बोटल्स स्विकारण्यात येईल. पुरवठाधारकांनी दिलेल्या ब्रॅन्ड व नमुन्याप्रमाणे बोटल्स पुरविण्याची दक्षता घ्यावी.



Scanned by CamScanner

५. पुरवठा करीत असलेल्या बोटलची Quantity जास्त असल्यामुळे, संस्थानकडून Randomly Sample घेऊन बोटल स्विकारल्या जातात. तथापी बोटल स्विकारलेनंतरही एखादा लॉट अगर काही बॉक्स खराब आढळल्यास ते स्वखर्चाने बदलून द्यावे लागतील.

६. पाणी बोटल पुरवितांना कायदयातील तरतुदीनुसार बॉक्स व बोटलवर Date of Packing, परिमाण and Best Before Date चा स्पष्ट उल्लेख असावा.

७. पाणी बोटलचे पॅकिंग बॉक्समध्ये असावे.

८. पुरवठा आदेशातील पुरवठा केलेल्या पाणी बोटलमध्ये भेसळ अथवा ते कमी प्रतीचे आढळल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी सबंधीत पुरवठाधारकाची राहील.

९. बोटल पॅकिंगसाठी वापरण्यात येणारे मटेरीअल Food grade असावे.

**L. लॅब तपासणीची कार्यपध्दती-**

१. पुरविलेल्या पाणी बोटलमधील पाण्याची गरजेनुसार संस्थान प्रयोगशाळा/जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा/ NABL/केंद्र शासनाच्या/राज्यशासनाच्या मान्यता प्राप्त प्रयोगशाळेतून तपासणी करणेत येईल.

२. संस्थानने करुन घेतलेले लॅब तपासणीमध्ये पुरविलेल्या पाण्याचे रिपोर्ट ISI Standard नुसार नसल्यास सदर बोटलचा लॉट बदलून द्यावा लागेल. त्यादरम्यान संस्थानला बाहेरुन पाणी बोटल विकत घ्याव्या लागल्यास जादा आलेल्या खर्चाची रक्कम अधिक पुरविलेले बोटलच्या किंमतीच्या २ ते ५ टक्के दंड देय असलेल्या कुठल्याही बील रकमेतून/सुरक्षा अनामत रकमेतून वसूल करण्यात येईल.

३. काही वेळेस लॅब रिपोर्ट येण्यासाठी विलंब होतो अशा वेळी जर आलेल्या बोटल वापरल्या गेल्या व नंतर लॅब रिपोर्ट ISI Standard प्रमाणे न आल्यास त्या लॉटमधील बोटलच्या किंमतीच्या २ ते ५ टक्केपर्यंत दंड आकारला जाईल.

४. एकाच प्रकारच्या बोटलचा लॅब रिपोर्ट सलग तीन वेळेस ISI Standard नुसार न आलेस सदर पुरवठाधारकावर संस्थानकडून उचित कारवाई करणेबाबत निर्णय घेतला जाईल. याबाबत पुरवठाधारकाची कुठलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

५. संस्थान लॅबचा रिपोर्ट Standards नुसार नसल्यास केंद्र शासनाच्या मुंबई येथील शासकीय/NABL लॅबमध्ये भांडार विभागाकडून तेच सॅम्पल तपासणी करुन त्याची पुर्न खात्री करण्यात येईल. सदर लॅबचा तपासणी अहवाल अंतिम समजन्यात येईल.

**M बील आदा करण्याची पध्दती-**

१. पुरविलेल्या पाणी बोटलचे बिल त्याचा ब्रॅन्ड, दर्जा व परिमाण योग्य असल्याची खात्री झाल्यावरच आदा करणेत येईल. सदर पुरवठ्यापोटी आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

२. पाणी बोटलची तपासणी करुन ताब्यात घेतलेल्या पाणी बोटलचे बील संस्थानकडे सादर केलेपासून ३० दिवसांचे आत संबंधित पुरवठाधारकाला आदा करण्याचा प्रयत्न राहिल.

३. पुरवठाधारकाने पुरविलेल्या पाणी बोटल संस्थानने नाकारल्या व त्यामुळे पुढील कालावधीसाठी संस्थानला बाजारभावाने दुसरीकडून पाणी बोटल खरेदी कराव्या लागल्यास त्यासाठी जादा आलेल्या खर्चाची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतुन अथवा संस्थानकडून देय असलेल्या इतर बिलातुन वसुल केली जाईल.

४. शासन नियमानुसार आवश्यक असलेल्या कर कपाती बिलातून करण्यात येतील.



Scanned by CamScanner

## N. आपत्ती/ नैसर्गिक आपत्ती, नुकसान भरपाई व दंडात्मक कारवाईबाबतची तरतुद :-

१. पुरवठा आदेशातील पाणी बोटल्स मुदतीत पुरविल्या नाही तर खालीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

| | |
|---|---|
| अ) पुरवठा न केलेल्या पाणी बोटलची किंमत रु.२.०० लाखापेक्षा कमी असल्यास | प्रती आठवडा ०.५ % दराने जास्तीत जास्त १० % पर्यंत |
| ब) पुरवठा न केलेल्या पाणी बोटलची किंमत रु.२.०० लाख किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास | प्रती आठवडा ०.५ % दराने जास्तीत जास्त ५ % पर्यंत |

२. पाणी बोटलचा पुरवठा दुरध्वनीवरुन अथवा मागणी चलनात दिलेले Schedule प्रमाणे अगर भांडार व कॅन्टीन विभागाने दिलेले वेळापत्रकाप्रमाणे न झाल्यास अगर योग्य प्रतीच्या नसल्यामुळे त्या नाकारल्या गेल्यास संस्थानची अडचण होऊ नये म्हणून, संस्थानला बाजारभावाने आवश्यक तितक्या किंवा दिलेल्या आदेशा इतक्या पाणी बोटल दुसरीकडून खरेदी करण्याची मुभा राहील. अशा खरेदी केलेल्या बोटलसाठी जादा लागलेल्या रकमेची (फरकाची) भरपाई पुरवठाधारकाने संस्थानला करुन दयावयाची आहे. सदरची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतून अगर पुर्वीच्या/नंतरच्या पुरविलेल्या पाणी बोटलच्या बिलातून वसुल करण्याचा अधिकार संस्थानला राहील.

३. संस्थानने मंजूर केलेले दराने व निवडलेल्या ब्रॅन्डप्रमाणे पाणी बोटलचा पुरवठा करणे बंधनकारक आहे. मंजूर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव दरवाढ मागण्याचा अधिकार पुरवठाधारकास असणार नाही अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. पुरवठाधारकाने पाणी बोटलचा पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा पाणी बोटलचा पुरवठा न केल्यास संस्थानला बाजारभावाने अथवा फेरनिविदा मागणी करुन बोटल खरेदी कराव्या लागल्यास जादा येणा-या खर्चाची नुकसान भरपाई पुरवठाधारकाकडून वसुल केली जाईल. तसेच याबाबत संस्थानच्या मा.तदर्थ समिती/ मा.व्यवस्थापन समिती/मा.उपसमिती/मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घेतलेले निर्णयाप्रमाणे उचित कारवाई करण्यात येईल. याबाबत पुरवठाधारकाची कुठलीही तक्रार ऐकुन घेतली जाणार नाही.

४. निविदा पुरवठा कालावधीमध्ये एखादी आपत्ती/ नैसर्गिक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी पुरवठाधारकांच्या नियंत्रणाबाहेर असेल. उदा.युद्ध, अतिवृष्टी, दुष्काळ, अपहरण, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भूकंप वगैरे) पुरवठाधारक पाण्याचा पुरवठा करु शकला नाही व तसे पुरवठाधारकाने संस्थानला त्वरीत लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परिस्थितीनुरुप घेण्यात येईल. तथापि सदर तरतूद ही फक्त पुरवठा करण्यात झालेला विलंब क्षमापित करण्याइतपत मर्यादित असून उपरोक्त परिस्थितीत मंजूर दरापेक्षा बाजारात दरवाढ झाल्यास त्यासाठी लागू राहणार नाही. पुरवठादाराला बाजारात दरवाढ झाली तरीही मंजुर दराने पुरवठा करणे बंधनकारक आहे. पुरवठादाराने पुरवठा न केल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल अगर मा.तदर्थ समिती/ मा.व्यवस्थापन समिती/मा.उपसमिती/मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जो निर्णय घेतील तो पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. याबाबत संबंधिताची कुठलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

## O निविदा वैधता कालावधी-

१. सदर ई-निविदेचा वैधता कालावधी ऑनलाईन निविदेच्या अंतिम तारखेपासून १२० दिवसांचा राहील.



17/3/2021

Scanned by CamScanner

## P. सर्व साधारण अटी शर्ती

१. निविदेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्पयावर निविदेतून माघार घेतल्यास त्यांची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

२. पुरवठादाराचे/ संस्थेचे आवश्यकता वाटल्यास Vendor Audit केले जाईल.

३. सदरील व्यवहाराबाबत वाद निर्माण झाल्यास तो राहाता/कोपरगाव कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.

४. राज्याबाहेरील निविदाकाराची निविदा मंजुर झाल्यास शासनाचे सुधारित खरेदी नियमावलीतील नियम क्र.३.१.२.८ नुसार राज्याबाहेरील पुरवठादार जर न्युनतम असला व महाराष्ट्र राज्यातील पुरवठादार व्दितीय न्युनतम असला तर महाराष्ट्र राज्यातील पुरवठादारांना प्रोत्साहन देण्यासाठी, महाराष्ट्र राज्यातील व्दितीय न्युनतम दरधारक जर न्युनतम दरधारकांच्या दरात पाणी बोटल पुरविण्यास तयार असेल तर एकूण खरेदी करावयाच्या बोटलच्या ५० टक्के बोटलचा पुरवठा आदेश राज्यातील पुरवठादाराला देण्यात येईल व ते जर तयार नसतील तर पुर्ण पाणी बोटलचा पुरवठा आदेश राज्याबाहेरील पुरवठादाराला देण्यात येईल.

५. पुरवठादाराने पाणी बोटलचा पुरवठा करावयाचे नाकारल्यास तसेच संस्थानने नमूद केलेले कुठल्याही अटी-शर्तीचा भंग झाल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन सदर पुरवठाधारकाचे नांव पुढील ३ वर्षासाठी काळ्या यादीत समावेश केले जाईल. याबाबत मा.तदर्थ समिती/ मा.व्यवस्थापन समिती/मा.उपसमिती/मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जो निर्णय घेतील तो आपणावर बंधनकारक राहील. याबाबत पुरवठाधारकाची काहीही तक्रार चालणार नाही.

६. कोणतीही निविदा अंशतः/पुर्णतः स्विकारणे किंवा सर्व निविदा नाकारणेचा हक्क संस्थानने राखून ठेवलेला आहे

७. सशर्त निविदा तात्काळ रद्द करण्यात येतील. सदर निविदेतील नमूद अटी-शर्ती व अर्हता पुर्ण करू न शकलेल्या निविदाधारकांच्या निविदा रद्द करण्यात येतील.

८. महाराष्ट्र शासनाचे पर्यावरण विभागाने दि.२३.०३.२०१८ व दि.३०.०६.२०१८ नुसार प्लॅस्टिक वापराबाबतच्या अधिसुचना सर्व निविदाधारकांना बंधनकारक राहतील. तसेच यापुढे शासनाने पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरसाठी वापरल्या जाणा-या प्लॅस्टिक बॉटलच्या धोरणात काही बदत केल्यास त्याप्रमाणे सुधारीत लागू झालेले नियम पुरवठाधारकास बंधनकारक राहतील.

९. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणे वा जादा अटी/शर्ती विहीत करण्याचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. निविदाधारकाची कोणतीही अट/अटी संस्थानवर बंधनकारक राहणार नाही, अशा निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

22/03/21

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी



17/3/2021

Scanned by CamScanner

# निविदाधारकाबाबत माहिती

१. फर्मचे नांव- ----------------------------------------

२. पत्रव्यवहारासाठी संपुर्ण पत्ता- ----------------------------------------

३. दूरध्वनी क्रमांक- ----------------------------------------

ऑफीस- ----------------------------------------

दुकान- ----------------------------------------

निवास- ----------------------------------------

मोबाईल नंबर- ----------------------------------------

फॅक्स नंबर- ----------------------------------------

ई –मेल ----------------------------------------

४. संपर्कासाठी व्यक्तीचे नांव- ----------------------------------------

दूरध्वनी/ मोबाईल क्रमांक- ----------------------------------------

५. मालकाचे/भागीदारांची नावे १. ----------------------------------------

२. ----------------------------------------

६. बॅंक खाते नांव १.----------------------------------------

शाखा २. ----------------------------------------

खाते नंबर व प्रकार ३.----------------------------------------

आयएफएससी कोड ४.----------------------------------------

दिनांक :- / /२०२१

ठिकाण :-

निविदाधारकाची सही व शिक्का



Scanned by CamScanner

अ) Technical Bid मधील कागदपत्रे (चेक लिस्ट)

१. अद्ययावत दुकान नोंदणी दाखला/ स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला
उत्पादक संस्थेचा दाखला/तत्सम परवाना
(उदा.ग्रामपंचायत, नगरपंचायत, नगर पालिका)

२. GST नोंदणी दाखला/GST Online Registration Acknowledgement

३. पॅन कार्ड

४. सन २०१७-१८,२०१८-१९ व २०१९-२० या ३ वर्षाचे सरासरी वार्षिक उलाढालीबाबतचे
चार्टर्ड अकाऊंटन्ट यांचे प्रमाणपत्र

५. अदययावत आयएसआय परवाना (ISI परवाना)

**ब) बोटलचे नमुने स्वतंत्र बॉक्समध्ये वरच्या बाजुस ब्रॅन्ड , फर्मचे नांव इ. तपशिलासह विहित तारखेला सादर करावे.**

**क) नमुने दिलेल्या बोटलची यादी**

**निविदाधारकाची सही व शिक्का**

दिनांक - / /२०२१
ठिकाण -



8/
17/3/2021

Scanned by CamScanner

प्रति,
**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)
शिर्डी, ता.राहाता, जिल्हा-अहमदनगर.

**विषय– सन २०२१-२२ करिता कॅन्टीन विभागासाठी पॅकेज्ड ड्रिंकींग वॉटर बोटल पुरविण्याचे ई-निविदेबाबत...**

महोदय,

खालील सही करणार मी/आम्ही कळवितो की, वरील विषयाबाबत आपण प्रसिद्ध केलेली निविदा वाचली. आपल्या निविदेत दिलेल्या सर्व अटी व शर्ती मी/आम्ही वाचल्या असून मला /आम्हाला मान्य आहेत. आपले अटी/शर्तींचे पालन करावयाचे मी/आम्ही मान्य करीत आहे/आहोत.

मी/आम्ही आपणांस निविदेमध्ये नमुद केलेल्या बोटल्सचा आपल्या मागणीप्रमाणे उपरोक्त कालावधीकरिता, संस्थानचे आवश्यकतेनुसार आवश्यक त्यावेळी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) यांचे भांडार पोहोच करण्याची हमी देतो. सदर परिमाण अंदाजे असल्यामुळे वेळ प्रसंगी नमुद केलेल्या परिमाणापेक्षा २५% पर्यंत जास्त पाणी बोटल्सची संस्थानतर्फे मागणी झाल्यास मी/आम्ही तो मंजुर दराने पुरविण्याची हमी देत आहे/आहोत.

ज्या ब्रॅण्डच्या निविदा मंजुर होतील, त्या मान्य दराने पुरवठा करण्याची हमी म्हणून एकुण पुरवठा आदेश रकमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून निविदा मंजुर झाल्याचे कळविल्यापासून १५ दिवसांचे आत मी/आम्ही रोख भरणा करु. याकरीता बयाणा रक्कम सुरक्षा अनामत खाती वर्ग करण्यास माझी संमती आहे. तसेच विहीत केलेल्या स्टॅम्प पेपरवर करारनामा नोटरी करुन देऊ व त्याप्रमाणे मंजूर दराने निविदा कालावधीत नमुन्याप्रमाणे पाणी बोटल वेळेवर शिर्डी येथील मध्यवर्ती भांडार विभागात पोहोच करणे आमचेवर बंधनकारक राहील.

दिनांक - / /२०२१
ठिकाण -

आपला/आपले विश्वासू,

फर्मचे मालकाचे/भागीदाराचे नांव

सही/सहया व शिक्का

(१) ----------------------------------

(२) ----------------------------------

**सोबत-** कागदपत्रे



१७/३/२०२१

# वार्षीक उलाढालीबाबतचे प्रमाणपत्र

दाखला देण्यात येतो की, मे. ------------------------------------------------ यांचे

निविदेसंबंधित व्यवसायाची नमूद आर्थिक वर्षाची उलाढाल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं | वर्ष | वार्षिक उलाढाल |
|---|---|---|
| १ | सन -२०१७-१८ | |
| २ | सन -२०१८-१९ | |
| ३ | सन- २०१९-२० | |
| | एकूण वार्षिक उलाढाल | |
| | सरासरी | |

लेखापरीक्षकाची सही/चार्टर्ड अकाऊंटंट
(नाव/सही शिक्का)
नोंदणी क्रमांक.

दिनांक :- / /२०२१
ठिकाण :-



17/3/2021

Scanned by CamScanner

STATEMENT SHOWING PURCHASE OF
PACKAGED DRINKING WATER FOR THE YEAR 2021-22
BOQ

| **Sr.No.** | **Description** | **Quantity** | **Unit** | **Rate Per Nos.** | **Total Amount** |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1 Litre Bottle (I.S.I.) | 19,71,000 | Nos. | | |
| 2 | 500 Ml. Bottle (I.S.I.) | 2,70,000 | Nos. | | |

22/03/2021

(Kanhuraj Bagate.I.A.S)
Chief Executive Officer
Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi

17/3/2021



Scanned by CamScanner